असा. क्र. २

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, जानेवारी ९, २००६/पौष १९, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

### अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.—** मुंबई शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . | ४-७ |

दिनांक ७ जानेवारी २००६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक ९ जानेवारी २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

**मुंबई शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९४९ चा मुंबई १५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी मुंबई, शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—



[**किंमत :** रुपये ९.००]

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई शुश्रूषा-गृह नोंदणी (सुधारणा) अधिनियम, २००५ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** मुंबई शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम, १९४९ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (२) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :— १९४९ चा मुंबई १५.

"(२) "स्थानिक पर्यवेक्षी प्राधिकारी" याचा अर्थ,—

(एक) महानगरपालिकांच्या अधिकारितेत मोडणाऱ्या क्षेत्रांमध्ये संबंधित महानगरपालिकेचा आरोग्य अधिकारी ;

(दोन) नगर परिषदेच्या अधिकारितेत मोडणाऱ्या क्षेत्रांमध्ये अशी परिषद ज्या जिल्ह्यामध्ये असेल त्या जिल्ह्याचा जिल्हा शल्य चिकित्सक ;

(तीन) कटकक्षेत्रांच्या अधिकारितेत मोडणाऱ्या क्षेत्रांमध्ये संबंधित कटकक्षेत्राचा आरोग्य अधिकारी ;

(चार) वरील उप-खंड (एक), (दोन) व (तीन) मध्ये न मोडणाऱ्या क्षेत्रांमध्ये संबंधित जिल्हा परिषदेचा जिल्हा आरोग्य अधिकारी ; ".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील, परंतुकामध्ये,—

(एक) खंड (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ब) शुश्रूषा-गृह, अशा व्यक्तीच्या व्यवस्थापनाखाली नाही की जिने वैद्यक शास्त्राची पदवी धारण केली आहे व जी अशा शुश्रूषा-गृहामध्ये राहते किंवा शुश्रूषा-गृहामध्ये कामावर नेमलेल्या अर्हता पात्र परिचारिकांची संख्या तिथे असलेल्या रुग्णांच्या संख्येच्या विहित प्रमाणानुसार नाही ;";

(दोन) खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

"(क-१) शुश्रूषा-गृहाच्या जागेचे क्षेत्र हे विहित क्षेत्रापेक्षा कमी आहे ;

(क-२) शुश्रूषा-गृहामध्ये उपलब्ध असलेल्या खाटांची संख्या विहित केलेल्या खाटांच्या संख्येपेक्षा अधिक आहे ;

(क-३) शुश्रूषा-गृह, शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याच्या स्वतःच्या मालकीचे आहे किंवा त्याच्या व्यवस्थापनाखाली आहे ; " ;

(ख) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (२) या कलमान्वये दिलेले नोंदणी प्रमाणपत्र हे, कलम ७ च्या तरतुदींना अधीन राहून, ज्या दिनांकास ते देण्यात आले किंवा यथास्थिति, त्याचे नवीकरण करण्यात आले त्या दिनांकाच्या लगतनंतर येणाऱ्या तिसऱ्या वर्षाच्या ३१ मार्च या दिनांकापर्यंत अंमलात राहील व तोपर्यंत ते वैध असेल.".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १५ च्या मूळ कलम ६ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

नोंदणी न केल्याबद्दल शास्ती.

" **६.** जी कोणतीही व्यक्ती, कलम ३ च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला, दोष सिद्ध झाल्यानंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील. ".

सन १९४९ चा मुबई अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम १२ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मध्ये,—

(क) " पन्नास रुपये " या मजकुराऐवजी " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " पंधरा रुपये " या मजकुराऐवजी, " पन्नास रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६, पोट-कलम (२), खंड (ब) मध्ये पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, राज्य शासनास, शुश्रूषा-गृहांच्या नोंदणीकरिता ते शुश्रूषा-गृह ज्या क्षेत्रामध्ये आहे, ते क्षेत्र, अशा शुश्रूषा-गृहांमध्ये उपलब्ध असलेल्या खाटांची संख्या, तिथे करण्यात येणारे विशेषोपचार या गोष्टी लक्षात घेऊन, फी चे निरनिराळे दर विहित करता येतील; ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

असा. क्र. ३ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण
प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, जानेवारी ९, २००६/पौष १९, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Nursing Homes Registration (Amendment) Act, 2005 (Mah.II of 2006), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. II of 2006.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette" on the 9th January 2006.)*

An Act further to amend the Bombay Nursing Homes Registration Act, 1949.

Bom. XV of 1949.

WHEREAS it is expedient further to amend the Bombay Nursing Homes Registration Act, 1949, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Fifty-sixth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Bombay Nursing Homes Registration (Amendment) Act, 2005.



 [किंमत : रुपये ९.००]

(*2*) It shall come into force on such date, as the State Government may, by notification in the *Official Gazette,* appoint.

Amendment of section 2 of Bom. XV of 1949.

**2.** In section 2 of the Bombay Nursing Homes Registration Act, 1949 (hereinafter referred to as " the principal Act"), for clause (*2*), the following clause shall be substituted, namely :— Bom. XV of 1949.

" (*2*) " local supervising authority " means,—

(*i*) in the areas falling within the jurisdiction of the Municipal Corporation—the Health Officer of the concerned Municipal Corporation;

(*ii*) in the areas falling within the jurisdiction of the Municipal Council— the Civil Surgeon of the District in which such Council is situated ;

(*iii*) in the areas falling within the jurisdiction of a Cantonment–the Health Officer of the concerned Cantonment ;

(*iv*) in the areas not falling in sub-clauses (*i*), (*ii*) and (*iii*) above– the District Health Officer of the concerned *Zilla Parishad* ; " .

Amendment of section 5 of Bom. XV of 1949.

**3.** In section 5 of the principal Act,—

(*a*) in sub-section (*1*), in the proviso,—

(*i*) for clause (*b*), the following clause shall be substituted, namely :—

" (*b*) that the nursing home is not under the management of a person who is holding a degree in medical sciences and who is resident in the home, or that there is not a prescribed proportion of qualified nurses employed in the nursing home to the number of patients in it ; or " ;

(*ii*) after clause (*c*), the following clauses shall be inserted, namely :—

" (*c-1*) that the area of the premises of the nursing home is less than the prescribed area ;

(*c-2*) that the number of beds available in the nursing home exceeds than those perscribed ;

(*c-3*) that the nursing home is owned or is under the management of a Government Medical Officer ; " ;

(*b*) for sub-section (*2*), the following sub-section shall be substituted, namely :—

" (*2*) A certificate of registration issued under this section shall, subject to the provisions of section 7, be in force and shall be valid until the 31st day of March of the third year next following the date on which such certificate is issued or renewed, as the case may be.".

4. For section 6 of the principal Act, the following section shall be substituted, namely :— Substitution of section 6 of Bom. XV of 1949.

"6. Whoever contravenes the provisions of section 3, shall, on conviction, be punished with imprisonment which may extend to six months or with fine which may extend to ten thousand rupees or with both.". Penalty for non-registration.

5. In section 12 of the principal Act,— Amendment of section 12 of Bom. XV of 1949.

(*a*) for the words "fifty rupees" the words "five thousand rupees" shall be substituted ;

(*b*) for the words "fifteen rupees" the words "fifty rupees" shall be substituted.

6. In section 16 of the principal Act, in sub-section (*2*), to clause (*b*), the following proviso shall be added, namely:– Amendment of section 16 of Bom. XV of 1949.

" Provided that, the State Government may prescribe different rates of fees for registration of nursing homes, having regard to the area in which such nursing home is situated, the number of beds therein, the number of specialisations offered in such nursing home ;".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ८ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, जानेवारी २३, २००६/माघ ३, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

### *ERRATA*

In the English translation of the Bombay Nursing Homes Registration (Amendment) Act, 2005 (Mah. II of 2006), published in the *Maharashtra Government Gazette,* Extraordinary, Part VIII, dated the 9th January 2006, at pages 4-6, on page 5, in line 29, *for* the word " perscribed " *read* " prescribed ".



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई